# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

**सभा व दप्तर कक्ष**

---

ज्ञानगंगा घरोघरी

# विद्वत परिषद बैठक

## कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| बैठक क्रमांक | : | 66 |
| स्थळ | : | **यश इन सभागृह (Offline/Online)** |
| दिनांक | : | रविवार 23 फेब्रुवारी 2025 |
| वेळ | : | दुपारी 3 : 00 वाजता |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

---

## 66वी विद्वत मंडळ बैठक

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्वत परिषदेची 66 वी बैठक (ऑनलाईन व ऑफलाईन) पद्धतीने सोमवार, दि. 23 फेब्रुवारी 2025 रोजी दुपारी 3.00 वा. आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस पुढील सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | मा. प्रा. संजीव सोनवणे, कुलगुरू, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक | अध्यक्ष | |
| 02 | मा. डॉ. जोगेंद्रसिंह बिसेन, मा. प्र-कुलगुरू आणि संचालक, बहुविद्याशाखीय विद्याशाखा | सदस्य | |
| 03 | मा. धनंजय बेळे, नाशिक | सदस्य | ऑनलाईन उपस्थित |
| 04 | मा. डॉ. नागार्जुन वाडेकर मा. संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा आणि संचालक, भाषा साहित्य व सांस्कृतिक अभ्यास विद्याशाखा | सदस्य | |
| 05 | मा. डॉ. सुरेंद्र पाटोळे, मा. संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य | |
| 06 | मा. डॉ. संजीवनी महाले, मा. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा | सदस्य | |
| 07 | मा. डॉ. चेतना कामळसकर, मा. संचालक, विज्ञान विद्याशाखा | सदस्य | |
| 08 | मा. श्री. माधव पळशीकर, संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा | सदस्य | |
| 09 | मा. डॉ. माधुरी सोनवणे, संचालक, कृषी विज्ञान विद्याशाखा | सदस्य | |
| 10 | मा. डॉ. जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | सदस्य | |
| 11 | मा. डॉ. कविता साळुंके, ऑनलाईन एज्युकेशन विद्याशाखा | सदस्य | |
| 12 | मा. डॉ. राम ठाकर, संचालक, व्यावसायिक शिक्षण आणि कौशल्य विकास विद्याशाखा आणि नियोजन अधिकारी, नियोजन व सुसुत्रीकरण विभाग | सदस्य | |
| 13 | मा. डॉ. रश्मी रानडे, प्र-संचालक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा | सदस्य | |
| 14 | मा. डॉ. प्रकाश बर्वे, उपग्रंथपाल, ज्ञानस्रोत केंद्र | सदस्य | |
| 15 | मा. डॉ. लतिका गायकवाड, सहा. प्राध्यापक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा | सदस्य | |
| 16 | मा. डॉ. दयाराम पवार, प्रमुख विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र | सदस्य | |
| 17 | मा. श्री. राजेंद्र वाघ, कृषी विज्ञान विद्याशाखा | सदस्य | |
| 18 | मा. डॉ. नितीन ठोके, कृषी विज्ञान केंद्र | सदस्य | |
| 19 | मा. प्रा. डॉ. प्रकाश देशमुख, संचालक, विद्यार्थी सेवा विभाग | निमंत्रित सदस्य | |
| 20 | मा. प्रा. डॉ. सज्जन थूल, प्र.संचालक, मूल्यमापन विभाग | निमंत्रित सदस्य | |
| 21 | मा. श्री. भटुप्रसाद पाटील, परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग | निमंत्रित सदस्य | |
| 22 | मा. दिलीप भरड | सदस्य-सचिव | |

पुढील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| 01 | मा. डॉ. अजय भामरे, प्र-कुलगुरू, मुंबई विद्यापीठ, मुंबई | सदस्य |
| 02 | मा. डॉ. राजेंद्र विखे पाटील, अध्यक्ष व कुलपती, प्रवरा मेडिकल सायन्स संस्था मु.पो. लोणी, ता. रहाता. जि. अहिल्यानगर | सदस्य |
| 03 | मा. डॉ. संजय चाकणे, प्राचार्य, T.J. College, खडकी, पुणे | सदस्य |
| 04 | मा. श्री. महेश दाबक, आनंदनगर, नाशिक | सदस्य |
| 05 | मा. श्री. राजेश पांडे, शिवाजी नगर, पुणे | सदस्य |
| 06 | मा. श्री. विलास विष्णू शिंदे, आडगाव नाशिक | सदस्य |
| 07 | मा. श्री. मधुकर गवळी, मु.पो. उगाव, ता. निफाड. जि. नाशिक | सदस्य |
| 08 | मा. डॉ. संजय तांबट, सिंहगड रोड, पुणे | सदस्य |
| 09 | मा. श्री. संजय वझे, कल्याण (प), जि. ठाणे | सदस्य |
| 10 | मा. श्री. अभिषेक भागवत, संचालक, विकासात्मक अभ्यास विद्याशाखा | सदस्य |
| 11 | मा. डॉ. मधुकर शेवाळे, संचालक, अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन कक्ष | सदस्य |

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)**

---

**66वी विद्वत परिषद बैठक**

## कार्यवृत्त

**रविवार 23.02.2025** **दुपारी 3:00 वाजता**

| विषय क्रमांक | | तपशील |
|---|---|---|
| 66.1.0 | | बैठकीसाठी ऑनलाईन\ऑफलाईन असलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे विद्वत परिषदेचे सदस्य सचिव श्री. भरड यांनी स्वागत केले. |
| 66.2.0 | 66.2.1 | दि. 13 जानेवारी 2025 रोजी झालेल्या 65 व्या विद्वत परिषद बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.<br>**ठराव** – सदस्य सचिव श्री. भरड यांनी 65 व्या विद्वत परिषद बैठकीचे कार्यवृत्त वाचून दाखवले. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 66.2.2 | दि. 13 जानेवारी 2025 रोजी झालेल्या 65 व्या विद्वत परिषद बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल.<br>**ठराव** – सदस्य सचिव श्री. भरड यांनी 65 व्या विद्वत परिषद बैठकीतील निर्णयावरील कार्यवाहीचा सादर केला. त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| 66.3.0 | | **सखोल चर्चेचे विषय** |
| | 66.3.1<br>**परीक्षा विभाग** | **विद्यापीठाच्या तिसाव्या दीक्षांत समारंभात प्रदान करण्यात येणाऱ्या पदव्या व पदविकांना मान्यता मिळणेबाबत...**<br>**टिपणी** – विद्यापीठाचा 30 वा दीक्षांत समारंभ दि. 24 फेब्रुवारी 2025 रोजी विद्यापीठाच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेला आहे. सदर दीक्षांत समारंभात विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या माहे डिसेंबर 2023/जानेवारी 2024, फेब्रुवारी/मार्च 2024 व मे/जून 2024 या वर्षातील प्रात्र विद्यार्थ्यांना पदव्या व पदविका, पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदव्या, एम.फिल व संशोधन पदव्या प्रदान करण्यास मान्यता मिळणेकरिता प्रस्ताव मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...<br>**ठराव** – विद्यापीठाच्या परीक्षा नियंत्रकांनी माहे डिसेंबर 2023/जानेवारी 2024, फेब्रुवारी/मार्च 2024 व मे/जून 2024 या वर्षातील विविध शिक्षणक्रमांच्या पात्र विद्यार्थ्यांच्या पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, एम.फिल व संशोधनातील विद्या वाचस्पती (पीएच.डी.) पदव्यांची माहिती मा. विद्वत परिषदेत विशद केली. मा. विद्वत परिषदेने सदर प्रस्तावास मान्यता देऊन सदर प्रस्ताव मा. व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव ठेवावा या शिफारशीसह सर्वानुमते ठराव केला. सदर प्रस्ताव याच सभेत वाचून याच सभेत कायम करण्यात आला. |
| | 66.3.2<br>**आस्थापना कक्ष** | **विद्यापीठातील शिक्षकांना कॅस अंतर्गत द्यावयाच्या लाभाबाबत....**<br>**टिपणी** – डॉ. सुरेंद्र नरेंद्र पाटोळे- सहयोगी प्राध्यापक, डॉ. दयाराम दुधाराम पवार -सहायक प्राध्यापक, डॉ. सुभाष सोनुने- सहायक प्राध्यापक, डॉ. प्रकाश विजय बर्वे- उपग्रंथपाल या शिक्षकांच्या कॅस लाभाकरिता युजीसी तसेच शासन निर्णयानुसार प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व ग्रंथपाल यांच्या समितीतील तीन विषयतज्ज्ञांच्या नामनिर्देशनास मा. कुलगुरूंनी विद्वत परिषदेच्या |

| | | |
|---|---|---|
| | | वतीने मान्यता दिली होती. सदर नामनिर्देशनासाठीचा प्रस्ताव विद्वत परिषदेसमोर कार्योत्तर मान्यतेसाठी सादर....<br>**ठराव** – विद्वत परिषदेच्या वतीने मा. कुलगुरूंनी कॅससाठी पुढील सदस्यांचे नामनिर्देशन केले होते.<br>(1) वाणिज्य व व्यवस्थापन – प्रा. वाणी लातुरकर, प्रा. दत्ता गुजराथी आणि प्रिती कुलकर्णी<br>(2) शिक्षणशास्त्र – प्रा. आर. सी. पटेल, प्रा. राजेंद्र पटेल आणि प्रा. बाविस्कर<br>(3) ज्ञानस्रोत केंद्र – प्रा. राजेंद्र कुंभार, प्रा. जगदीश कुलकर्णी आणि प्रा. मालन खिराडे<br>वरीलपैकी नामनिर्देशित सदस्यांनी येण्यास असमर्थता दर्शविल्यास त्यांच्या जागी दुसरे सदस्य नामनिर्देशित करण्याचा अधिकार मा. विद्वत परिषदेच्या वतीने मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात यावा. या प्रस्तावास आणि मा. कुलगुरूंनी केलेल्या क्र. (1) ते क्र. (3) या सदस्यांच्या नामनिर्देशनास सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | 66.3.3 | **युजीसीच्या दि. 7 फेब्रुवारी 2025 च्या मेलनुसार Environment Education Course हा कोर्स पदवीपूर्व सर्व शिक्षणक्रमांना अनिवार्य करणेबाबत....**<br>**टिपणी** – दि. 7 फेब्रुवारी 2025 रोजी युजीसीचा मेल प्राप्त झाला. त्यात त्यांनी विद्यापीठात राबविण्यात येणाऱ्या सर्व पदवीपूर्व शिक्षणक्रमांना Environment Education हा शिक्षणक्रम अनिवार्य करण्याबाबत स्पष्ट सूचना आलेल्या आहेत. याबाबतचा विषय विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर.....<br>**ठराव** – विद्यापीठ अनुदान आयोगाने पाठविलेल्या सुचनेप्रमाणे 'Environment Education' हा अभ्यासक्रम सर्व पदविका, पदवी शिक्षणक्रमांसाठी यापूर्वीच सुरू करण्यात आला आहे अशी माहिती विशद करण्यात आली. त्यामुळे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (UGC)च्या इ-मेलची नोंद घेण्यात आली. तरीही याबाबत विद्यापीठातील सर्व शिक्षणक्रमांबाबत तपासणी करण्यासाठी डॉ. संजीवनी महाले अध्यक्ष, डॉ. जयदीप निकम व डॉ. चेतना कामळसकर, डॉ. राम ठाकर, सदस्य सचिव अशी समिती गठीत करण्याची सुचना मा. कुलगुरूंनी मांडली. या समितीने सर्व शिक्षणक्रमांबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सुचनांनुसार 'Environment Education'बाबत माहिती घेऊन पुढील विद्वत परिषदेच्या बैठकीत विशद करावी असे सुचित केले. मा. कुलगुरूंनी केलेल्या सूचनेला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 66.3.4<br>**स्कूल ऑफ औनलाईन लर्गिंग** | **'School of Online Learning' या विद्याशाखेचे नामभिधान 'School of Online Education' असे करणेबाबत....**<br>**टिपणी** - 'School of Online Learning' या विद्याशाखेची स्थापना व्यवस्थापन मंडळ ठराव 188.3.16 नुसार करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार शिक्षण पध्दतीत झालेले व येऊ घातलेले बदल लक्षात घेता, मुक्त,दूरस्थ व Online Learning या नामाभिधानामुळे येणाऱ्या मर्यादा दूर करण्यासाठी 'School of Online Learning' या विद्याशाखेचे नामभिधान 'School of Online Education' असे करण्यास मा. कुलगुरूंनी मान्यता दिलेली आहे. सदरचा विषय कार्योत्तर मान्यतेसाठी मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर....<br>**ठराव** – विद्वत परिषदेच्या वतीने मा. कुलगुरूंनी दिलेल्या 'School of Online Learning' या विद्याशाखेच्या 'School of Online Education' या नामाभिधानाला मा. व्यवस्थापन मंडळाच्या ठराव क्रमांक 198.4.6 नुसार मा. विद्वत परिषदेच्या वतीने मान्यता देण्यात आली होती. परंतु विद्यापीठत 'डिजीटल युनिर्वसिटी' कडे वाटचाल करीत आहे आणि या विद्याशाखेमार्फत राबविले जाणारे शिक्षणक्रमही 'Digitally' उपलब्ध करून दिले जात आहे. |

सबब या विद्याशाखेचे नामाभिधान 'School of Online Education' ऐवजी 'School of Digital Education' असे करण्याच्या मा. कुलगुरूंच्या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता दिली. तसेच या विद्याशाखेअंतर्गत 'Center for Online Education' या केंद्राची स्थापना करून दूरशिक्षण परिषदेच्या निकषांनुसार सर्व शिक्षणक्रमांची रचना करावी या प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**66.3.5**
**विज्ञान विद्याशाखा**

**दि. 24 जानेवारी 2025 रोजी आयोजित विज्ञान विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेवर मान्यतेस्तव सादर....**

**टिपणी** – दि. 24 जानेवारी 2025 रोजी विज्ञान विद्याशाखा परिषद आयोजित करण्यात आली होती. त्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...

**ठराव** – विज्ञान विद्याशाखेच्या विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तातील ठळक मुद्यांविषयी माहिती विज्ञान विद्याशाखेच्या संचालक डॉ. चेतना कामळसकर यांनी विषद केली. विद्याशाखा परिषदेने मान्य केलेल्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**66.3.6**
**विद्यार्थी सेवा विभाग**

**विद्यापीठाच्या विभागीय केंद्रांची पुर्नरचना करणेबाबत..**

**टिपणी** – विभागीय केंद्र व त्यांचे अंतर्गत असलेले अभ्यासकेंद्र यांचेमार्फत विद्यार्थ्यांना प्रवेश, परीक्षा तसेच अन्य सोई सुविधा वेळेत व जलदगतीने मिळाव्यात यासाठी तसेच भारत सरकारच्या राजपत्रात प्रकाशित विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. 4 सप्टेंबर 2020 च्या शैक्षणिक धोरण अधिसूचनेतील कलम 2 (zb) नुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे महाराष्ट्रातील विभागीय केंद्रांची खालीलप्रमाणे पुनर्रचना करणेबाबत समितीत चर्चा करण्यात येऊन सर्वानुमते खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | विभागीय केंद्र | जोडण्यात येणारे जिल्हे |
|---|---|---|
| 1 | अमरावती विभागीय केंद्र | अमरावती, यवतमाळ |
| 2 | अकोला विभागीय केंद्र | अकोला, बुलढाणा, वाशिम |
| 3 | नागपूर विभागीय केंद्र | नागपूर, वर्धा, भंडारा |
| 4 | गडचिरोली विभागीय केंद्र | गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर |
| 5 | छत्रपती संभाजीनगर विभागीय केंद्र | छत्रपती संभाजीनगर, जालना |
| 6 | धाराशिव विभागीय केंद्र | धाराशिव, बीड |
| 7 | नांदेड विभागीय केंद्र | नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर |
| 8 | नाशिक विभागीय केंद्र | नाशिक, धुळे |
| 9 | अमळनेर विभागीय केंद्र | जळगाव, नंदुरबार |
| 10 | पुणे विभागीय केंद्र | पुणे, रायगड, अहिल्यानगर (बारामती, इंदापूर, दौंड व सासवड वगळून) |
| 11 | बारामती विभागीय केंद्र | पुणे जिल्ह्यातील बारामती, इंदापूर, दौंड व सासवड, सोलापूर, सातारा |
| 12 | कोल्हापूर विभागीय केंद्र | कोल्हापूर, सांगली |
| 13 | रत्नागिरी विभागीय केंद्र | रत्नागिरी, सिंधुदुर्ग |

<table>
<tr>
<td></td>
<td></td>
<td>
<table>
<tr><td>14</td><td>मुंबई विभागीय केंद्र</td><td>मुंबई शहर व उपनगरे</td></tr>
<tr><td>15</td><td>ठाणे विभागीय केंद्र</td><td>ठाणे, पालघर</td></tr>
</table>
नांदेड विभागीय केंद्रांतर्गत लातूर येथे Satellite केंद्र विद्यापीठाच्या ध्येय, धोरणे, उद्दिष्टे प्रभावीपणे राबविण्यासाठी 'मसाविका' 2016 मधील कलम 2(48) च्या धर्तीवर सदर केंद्र प्रस्तावित करावे अशी शिफारस समितीने केलेली आहे.
वरीलप्रमाणे विभागीय केंद्रांची पुनर्रचना करणेबाबत समितीत सर्वानुमते निर्णय घेण्यात आलेला असून प्राधान्याने बारामती व अमळनेर हे दोन विभागीय केंद्र कार्यान्वित करावेत तसेच तेथे लागणारे मनुष्यबळ समितीने सुचविल्यानुसार उपलब्ध करून द्यावे सदर मनुष्यबळ अहवाल सोबत जोडलेला असून उर्वरित पाच विभागीय केंद्रे टप्याटप्याने सुरू करण्यात यावेत असे सर्वानुमते शिफारस करण्यात आलेली असून हा विषय विद्वत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...
ठराव – वरील विषयाबाबत मा. कुलगुरूंनी सर्व सदस्यांना सध्याच्या विभागीय केंद्रांना जोडण्यात आलेल्या जिल्ह्यांचे आणि विभागीय केंद्रांचे भौगोलिक अंतर लक्षात घेता विद्यार्थ्यांना विभागीय केंद्राशी संपर्क साधण्यात अडचणी येतात. तसेच प्रवेश, परीक्षा यांमध्येही अडचणी येतात. येत्या काळात विविध शिक्षणक्रमांची रचना होणार असून विद्यार्थ्यांना सोयीचे होण्यासाठी ही पुनर्चचना आवश्यक आहे असे विशद केले. तसेच ही रचना टप्प्याटप्प्याने आचरणात आणली जाईल असेही विशद केले. सबब, सर्वप्रथम प्राधान्याने बारामती येथील विभागीय केंद्र कार्यान्वित करावे तद्नंतर अंमळनेर येथील इमारत ताब्यात मिळाल्यानंतर अंमळनेर विभागीय केंद्र कार्यान्वित करण्याची कार्यवाही करावी. मनुष्यबळाबाबत मा. व्यवस्थापन मंडळाच्या दि. 18-जुलै-2024 रोजीच्या 194.3.2 या ठरावाप्रमाणे राहील. सदर विषयाला सर्वानुमते मान्यता देण्यात आली.
</td>
</tr>
<tr>
<td>66.4.0</td>
<td></td>
<td>मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे ऐनवेळेचे विषय</td>
</tr>
<tr>
<td></td>
<td>66.4.1</td>
<td>
आरोग्य विज्ञान विद्याशाखेच्या दि. 21-02-2025 रोजी झालेल्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सादर....
टिपणी – दि. 21-2-2025 रोजी आरोग्य विद्याशाखा परिषद आयोजित करण्यात आली होती. त्या विद्याशाखा परिषदेचे इतिवृत्त मा. विदवत परिषदेसमोर मान्यतेस्तव सादर...
ठराव – आरोग्य विद्याशाखेच्या विद्याशाखा परिषदेच्या इतिवृत्तातील ठळक मुद्यांविषयी माहिती आरोग्य विद्याशाखेच्या संचालक डॉ. रश्मी रानडे यांनी विषद केली. विद्याशाखा परिषदेने मान्य केलेल्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.
</td>
</tr>
</table>

**अध्यक्ष**
**विद्वत परिषद**

**सदस्य सचिव**
**विद्वत परिषद**